REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १७ जानेवारी, १९४० | अंक ३

## तेजस्वी व निरोगी शरीर

शरीर तेजस्वी व निरोगी असावयास अंगांत भरपूर रक्त खेळलें पाहिजे.



अनेक आजारांमुळें शरीरांतील रक्त कमी कमी होऊन त्याचें पर्यवसान पंडुरोग, रक्तक्षय अथवा ॲनीमिया या भयंकर रोगांत होतें.



### रक्तवर्धक—

पंडुरोग अथवा ॲनीमिया यांवर अचूक गुणकारी आहे; तसेंच आजारानंतर येणारी अशक्तता 'रक्तवर्धक' तावडतोब घालवितें. 'रक्तवर्धक'च्या नियमित सेवनानें दर आठवड्यास लक्षावधि रक्तकण वाढतात. व थोड्याच अवधींत शरीरास जोरदार रक्ताचा भरपूर पुरवठा होऊन शरीर निरोगी व सशक्त बनतें.

आयुर्वेद रसशाळा,
पुणें लि.
हेड ऑफीस—पुणें ४.
मुंबई शाखा—मॅजेस्टिक सिनेमासमोर,
गिरगांव मुंबई ४.

## रक्तवर्धक




अप-टु-डेट शिलाईकरितां

## महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार चौक, पुणें

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडारा-चे माडीवर

# विविध माहिती

### रिझर्व्ह बँकेची वार्षिक सभा

रिझर्व्ह बँकेची पाचवी वार्षिक सभा कलकत्ता येथें ता. ५ फेब्रुवारी, १९४० रोजीं भरणार आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी ३१¾ लक्ष रुपये फायदा झाला. त्यांतून भागीदारांस करमाफ ७% डिव्हिडंड आणि २% बोनस मिळावयाचें आहे.

### गहूं परिषद

पंजाब, सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, सिंध, इत्यादि प्रांतांत गहूं हें महत्त्वाचें पीक आहे. ह्या प्रांताच्या सरकारी प्रतिनिधींची एक परिषद् लाहोर येथें १९ जानेवारी रोजीं हिंदुस्थान सरकारच्या व्यापारमंत्र्याचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

### युद्धविषयक पेन्शनें

गेलें महायुद्ध समाप्त होऊन इतकीं वर्षे लोटलीं तरी त्यांत भाग घेतलेल्या सैनिकांच्या पेन्शनांवर ब्रिटिश सरकारास अद्याप दरसाल सुमारें ५० कोटि रुपये खर्च येतो. गेल्या २५ वर्षांत ह्या पेन्शनांवर सरकारचे सुमारें १८ अब्ज रुपये खर्च झाले. अजून ८३ लक्ष लोकांस पेन्शन चालू आहे.

### बँक ऑफ बरोडा लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी, मागील वर्षांतून ओढलेली रकम धरून, आणि इनकम टॅक्स आणि सुपरटॅक्स ह्यासाठीं रकम बाजूस काढून, निवळ नफा ५ लक्ष, ६१ हजार रुपये झाला. भागीदारांस करमाफ १०% डिव्हिडंड मिळणार आहे.

### युद्धपरिस्थिति आणि स्त्रियांचे पोषाक

युद्धपरिस्थितीमुळें ग्रेटब्रिटनमधील स्त्रियांच्या पोषाकांत साधेपणा आला असून त्यांतील वैचित्र्य कमी झालें आहे. कापडाचे दुकानदार आणि शिंपी ह्यांस त्यामुळें काळजी वाटूं लागली आहे.

### फ्रेंच रेल्वेजसाठीं ब्रिटिश वाघिणी

फ्रान्समधील रेल्वेजचे कांहीं भाग ब्रिटिश फौजेचे नियंत्रणाखालीं आहेत. तेथील वाहतुकीसाठीं २५० इंजनें आणि १० हजार वाघिणी तयार करण्याचें काम ब्रिटिश कारखान्यांत चालू आहे.

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज् लि.

वरील कंपनीस गेल्या वर्षी ३२½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस करमाफ ५% डिव्हिडंड मिळालें.

### चलनी नोटांत वाढ

युद्धपरिस्थितीमुळें गेल्या चार महिन्यांत हिंदुस्थानांतील व्यापारांत वाढ झाली आहे, त्यामुळें व्यवहारांत असलेल्या चलनी नोटांत ५५ कोटि रुपयांची भर पडली आहे. १ सप्टेंबर, १९३९ रोजीं १८२ कोटि रुपयांच्या नोटा प्रचलित होत्या; ५ जानेवारी, १९४० रोजीं २३७½ कोटि रुपयांच्या नोटा व्यवहारांत होत्या. लोकांच्या हातांतील रुपयांची संख्या ह्याच मुदतींत ७९ कोटींची ६१ कोटि झाली.

### यूनियन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या सहा महिन्यांत गेल्या वर्षांतील बाकी नफा धरून २ लक्ष, ६२ हजार रुपये झाला. भागीदारांस करमाफ ५½% डिव्हिडंड मिळालें.

### मनिऑर्डरीनें परदेशाशीं देवघेव

हिंदुस्थानांतून मनिऑर्डरीचे स्वरूपांत जेवढे रुपये बाहेर गेले, त्या मानानें ५ कोटि, १६ लक्ष रुपये १९३८–३९ मध्यें हिंदुस्थानांत अधिक आले. सर्वांत ज्यास्त रकम केनिया, युगांडा आणि टांगानिका येथून आली; त्याचे खालोखाल ग्रेटब्रिटन आणि दक्षिण आफ्रिका येथून आली.

### हिंदुस्थान सरकारची देणगी

गेल्या धरणीकंपामुळें तुर्कस्तानांतील हजारों लोकांचा आसरा नाहींसा झाला आहे. त्यांचेसाठीं हिंदुस्थान सरकारनें तुर्की सरकारास १ हजार तंबू देऊं केले आहेत. ह्या तंबूंत १६,००० लोकांची सोय होईल.

### युद्धमंत्र्याचा राजीनामा

ब्रिटिश मंत्रिमंडळांतील युद्धमंत्रि मि. होअर बेलिशा ह्यांनीं मंत्रिमंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. मंत्रिमंडळाची पुनर्रचना करतांना त्यांस देऊं केलेली जागा त्यांस पसंत न पडल्यामुळें त्यांनीं राजीनामा दिला, परंतु मंत्रिमंडळाचें आणि त्यांचें दुमत कधींच झालेलें नव्हतें, असें प्रसिद्ध झालें आहे.

### राष्ट्रसंघाचें वाङ्मय

युद्धामुळें राष्ट्रसंघाचा इतर खर्च कमी करण्यांत आला असला तरी वाङ्मयीन कार्य पूर्ववत चालू रहाणार आहे. एकूण वाङ्मयाचे पूर्वीप्रमाणें आर्थिक, आरोग्यविषयक, सामाजिक, राजकीय, कायदेविषयक, मादक द्रव्यासंबंधीं, शस्त्रसंन्यासविषयक वगैरे विभाग पाडण्यांत आले आहेत. याशिवाय आकडेवार माहिती देणारें व्यापारी मासिक, आरोग्यविषयक मासिक व इतर नियतकालिकें हीं नेहमीप्रमाणें निघणार आहेत. सर्व राष्ट्रांतील बिनचुक माहिती एकत्र करून ती उपयुक्त स्वरूपांत प्रसिद्ध करण्यानें राष्ट्रसंघाचें कार्य सर्वत्र वाखाणलें गेलें आहेच.

### लखनौच्या वेढ्यांतील इंग्रज

लखनौ येथील १८५७ सालांतील वेढ्यांत सापडल्यांपैकीं आठ इंग्रज अद्याप जिवंत आहेत.

### जंतूंचें सुरक्षित स्थळीं स्थलांतर

पॅरिस येथील पॅसच्यूर इन्स्टिट्यूटचें स्थलांतर करण्यांत आलें आहे. ह्या संस्थेचे संग्रहीं रोगाचा प्रसार करणारे सर्व तऱ्हेचे लक्षावधि जंतू आहेत, त्यावर बाँब पडल्यास शास्त्रज्ञांचें हजारों तासांचें काम वाया जाईल आणि झालेलें नुकसान भरून काढण्यास कित्येक वर्षे लागतील.

### फॉन

२० फुटांचे अंतरावर १०० फॉन्सपेक्षां अधिक मोठा आवाज येणार नाहीं, अशींच मोटारींचीं शिंगें तयार करण्याचें ब्रिटिश कारखानदारांनीं कबूल केलें आहे. आवाज मोजण्याचें फॉन हें शास्त्रीय माप आहे. मोठ्यानें एकमेकाशीं बोललें तर ६० ते ७५ फॉन्स इतका आवाज होतो आणि दोन मित्रांचें खासगी बोलणें २५ फॉन्स भरतें ह्यावरून फॉन ह्या मापाची कल्पना येईल.

### फुटपाथची दुरुस्ती

मुंबई शहरांतील फुटपाथची दुरुस्ती करण्यासाठीं १९४०–४१ मध्यें ५ लक्ष रुपयांची एक योजना तयार करण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | २६ | ६ थाणे इंजिनिअरिंग कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन | ३० |
| २ औद्योगिक संरक्षण आणि जकातींचें प्रमाण ... | २७ | ७ अलाहाबाद येथील आर्थिक परिषद ... ... | ३१ |
| ३ बँकेच्या ठेवीदारांचें हितसंरक्षण ... ... | २८ | ८ कऱ्हाड येथील कृष्णेवरील पूल ... ... | ३२ |
| ४ स्वदेशांतील परदेशी बँका | २८ | ९ अहमदनगर येथील स्त्रियांमधील जागृति ... | ३२ |
| ५ स्फुट विचार | २९ | १० लोकसंख्या आणि रहाणीचें मान ... | ३३ |
| रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी—वऱ्हाडांतील सेंट्रल बँका—इंपीरिअल बँकेचा व्याजाचा दर वाढला | | ११ आमच्या अपेक्षा ... | ३४ |
| | | १२ निवडक बाजारभाव | ३५ |



# अर्थ

बुधवार, ता. १७ जानेवारी, १९४०


## औद्योगिक संरक्षण आणि जकातींचें प्रमाण

औद्योगिक संरक्षणाचें धोरण ह्या देशांत चालू झाल्यापासून जकातींच्या दरांमध्यें वाढ होणें अपरिहार्य होतें आणि मालाच्या किंमती देशांत चढणेंहि स्वाभाविक होतें. बाहेरून येणाऱ्या मालावर जकाती बसवून त्याची आयात मर्यादित करणें आणि अशा रीतीनें स्वदेशी मालास उत्तेजन देणें हा औद्योगिक संरक्षणाचा मुख्य हेतु असतो. संरक्षित मालाच्या किंमती वाढतात, त्यांचा बोजा तो वापरणाऱ्या जनतेवर पडतो. परंतु देशांतील उद्योगधंद्यांची वाढ होऊन लोकांस काम मिळणें व त्यांची प्राप्ती वाढणें हे उद्देश सफल होण्यास हा बोजा सहन करणें आवश्यक असतें. संरक्षक जकातींचा बोजा जनतेवर वाजवीपेक्षा अधिक पडणार नाहीं आणि त्यांचा पूर्ण फायदा राष्ट्राच्या पदरांत पडेल अशी तजवीज ह्याचसाठीं करण्यांत येते. टॅरिफ बोर्ड ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवतें. देशी धंद्यांची उन्नति तर व्हावयास पाहिजे, पण त्यासाठी अधिक किंमतीचा स्वार्थत्याग करावयास नको, असें म्हणून चालणार नाहीं. औद्योगिक संरक्षणाचा दुसरा एक परिणाम असा होतो, कीं त्या योगानें संरक्षित मालाची आयात कमी किंवा नाहींशी होऊन सरकारचें आयात जकातींपासून होणारें उत्पन्न घटतें. तथापि लोकांची सांपत्तिक सुधारणा होणें हें सरकारच्या दृष्टीनेंहि इष्ट असतें. त्याच्या तिजोरीचें ह्या रीतीनें होणारें नुकसान अन्य मार्गानें भरून काढावें लागतें व निघतें. संरक्षक जकातींचा अनिष्ट बोजा सामान्य जनतेवर पडतो अशी तक्रार मध्यवर्ती असेंब्लीमध्यें करण्यांत आली असून त्यांच्यामुळें आपलें उत्पन्न बुडालें असल्याचें हिंदुस्थान सरकारच्या फडणवीसांनीं बोलून दाखविलें आहे. ह्या संबंधांत चौकशी होऊन तद्विषयक माहिती प्रसिद्ध होण्याची आवश्यकताहि प्रतिपादण्यांत आली होती. तीस अनुसरून हिंदुस्थान सरकारचे सल्लागार, डॉ. ग्रेगरी, ह्यांनीं चौकशी केली आहे आणि तुलनात्मक आकडे तयार केले आहेत. त्यांच्या पत्रकाचा सारांश प्रसिद्ध झाला आहे तो बोधप्रद आहे परंतु त्यापासून औद्योगिक संरक्षणाच्या धोरणास प्रतिकूल असा अभिप्राय निघूं शकत नाहीं. १९२६–२७ ते १९३६–३७ ह्या दहा वर्षांची तुलनात्मक माहिती डॉ. ग्रेगरी ह्यांनीं दिली आहे.

हिंदुस्थानासारख्या दरिद्री व कृषिप्रधान देशांत मध्यवर्ती सरकाराच्या मुख्य उत्पन्नाची बाब आयात जकाती असणें अगदी स्वाभाविक आहे. हिंदुस्थान सरकारच्या एकूण उत्पन्नापैकी ५८ टक्के उत्पन्न आयात जकातींचें होतें, तो आकडा वरील दहा वर्षांत ४९ टक्के इतका घटला आहे. हिंदी मध्यवर्ती सरकारास आपलें निम्में उत्पन्न आयात जकातींपासून निर्माण करावें लागतें, त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. १९३१–३२ सालीं आर्थिक मंदीस प्रारंभ झाल्याकारणानें जकातींचे दर चढविण्यांत आले. सर्वसाधारणपणें मालाच्या किंमतीच्या प्रमाणांत १५ टक्के जकात घेण्यांत येत असे, ती २५ टक्के करण्यांत आली आणि तो दर आजहि कायम आहे. १९३३ मध्यें ओटावा करारास अनुसरून साम्राज्यांतर्गत मालास जकातींच्या सवलती देण्यांत आल्या आणि स्वदेशी मालास उत्तेजन देण्याच्या हेतूनें १९३४ सालीं कांहीं जिनसांवरील जकाती काढल्या गेल्या. १९३६–३७ सालीं १९२६–२७ च्या मानानें मालाच्या वजनांत २० टक्के घट झाली, पण त्याची किंमत ह्या अवधींत ४२ टक्क्यांनीं उतरली. जकातीच्या दरांत वाढ आणि मालाच्या किंमतींत घट ह्या दुहेरी कारणांमुळें जनतेवर पडणारा कराचा बोजा वाढला आहे. हा बोजा अलीकडे कमी होत चालला आहे. तरी मंदीच्या पूर्वीच्या काळाशीं तुलना करतां तो अधिक आहे. जकाती दोन प्रकारांच्या असतात. किंमतीप्रमाणें ठराविक दरानें आकारलेल्या आणि वजन व माप ह्यांवर आधारलेल्या. पहिल्या प्रकारच्या जकातींचें उत्पन्न एकूण उत्पन्नांच्या निम्या इतकें असून एकूण आयात मालाच्या ५५ ते ७५ टक्के मालावर त्या तऱ्हेची जकात घेण्यांत येते. कांहीं जातींच्या मालाचे बाबतींत दोन्हीं प्रकारांच्या जकातींचें मिश्रण असतें. पहिल्या प्रकारच्या जकातींचा बोजा इतर प्रकारांप्रमाणें वाढलेला नाहीं.

कापसाचें कापड, साखर, लोखंड, पोलाद व काड्यांच्या पेट्या ह्या सर्व मालास जकातींचें संरक्षण देण्यांत आलें असल्यानें १९२६–२७ ते १९३६–३७ ह्या दहा वर्षांत त्यांची जकात पुष्कळच घटली. ह्या मालाची एकूण किंमत, दहा वर्षांमागें त्याच्या आयातीवरील जकातीचें उत्पन्न सरकारला मिळत असे, त्याच्यापेक्षाहि आतां कमी आहे! दहा वर्षांचे पूर्वी वरील मालाच्या आयातीची किंमत ८५ कोटि रुपये होती आणि त्यावर सरकारला १६$\frac{3}{4}$ कोटि रुपये जकात मिळाली होती. १९३६–३७ सालीं सबंद मालाची किंमतच १६$\frac{1}{2}$ कोटि रुपये भरली आणि त्यावर पुरे ४$\frac{1}{4}$ रुपयेहि जकात आली नाहीं. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे १९२६–२७ सालीं कापड, साखर, लोखंड व काड्यांच्या पेट्या ह्यांवरील जकातीचें उत्पन्न जकातीच्या एकूण उत्पन्नाच्या ४१ टक्क्यांइतकें होतें, १९३६–३७ मध्यें हें प्रमाण १५ टक्क्यांवर उतरलें. औद्योगिक संरक्षणाचें धोरण यशस्वी होऊन संरक्षित स्वदेशी मालाची पैदास वाढली आहे आणि त्याच्याशीं स्पर्धा करणाऱ्या विलायती मालाची आयात घटली आहे, हा वरील आकड्यांचा स्पष्ट अर्थ आहे. वर निर्दिष्ट केलेल्या विलायती मालाच्या आयातीच्या किंमतीचें, एकूण मालाच्या आयातीच्या किंमतीशीं प्रमाण १९२६–२७ मध्यें ३७ टक्के होतें तें १९३६–३७ सालीं केवळ १२ टक्के झालें. विलायती मालाची आयात घटल्यानें त्यावरील जकातींचें सरकारी उत्पन्नहि कमी झालें, हें उघड आहे. त्याचबरोबर, स्वस्त विलायती मालाची जागा महाग स्वदेशी मालानें घेतल्यानें हिंदी जनतेस झीज सोसावी लागली आहे. स्वदेशीच्या उत्कर्षासाठीं ही किंमत लोकांनीं दिली आहे.

## बँकांच्या ठेवीदारांचें हितसंरक्षण

### आजची परिस्थिति व रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या सुधारणा

हिंदी बँकिंगविषयक कायद्यांत कोणत्या दुरुस्त्या करणें आवश्यक आहे, ह्यासंबंधीच्या आपल्या सूचना रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारास सादर केल्या आहेत आणि त्या हिंदुस्थान सरकारनें हितसंबंधी संस्थांकडे आणि व्यक्तींकडे पाठवून त्यांचें त्यांवर येत्या एप्रिलपूर्वी मत मागविलें आहे. सरकारनें ह्या सूचनांचा अद्याप विचार केलेला नाहीं. रिझर्व्ह बँकेनें व्यक्त केलेल्या अभिप्रायाचा आणि सूचनांचा सारांश येथें दिला आहे:—

### आजची परिस्थिति

(१) बँकिंगविषयक कायद्यांत दुरुस्ती करण्याचें काम दिरंगाईवर टाकून मुळीच चालणार नाहीं.

(२) "बँकिंग"च्या व्याख्येचा अर्थ लावणें अत्यंत कठीण झालें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील १,४२१ बँकांपैकी फक्त ६७२ बँका नव्या कंपनी कायद्याप्रमाणें रजिस्ट्रारकडे हिशेबाचे तक्ते पाठवतात व आवश्यक तेवढी रकम रोख बाळगतात. बाकीच्या बँका "आम्हांस ह्या कायद्याचा भाग लागूच नाहीं" असें म्हणतात आणि हें त्यांचें म्हणणें कांहीं बाबतींत कोर्टांनीं उचलून धरलें आहे.

(३) कांहीं प्रांतिक बँकांनीं कर्ज नियंत्रणाबाबत कायदे केले आहेत, त्यांत शेड्यूल्ड बँका आणि इतर बँका ह्यांचे संबंधांत भेदभाव दाखविला आहे. लहान बँकांचे व्यवहारावर स्थानिक नियंत्रण असणें अनिष्ट नाहीं.

(४) ज्या बँकांचे भाग भांडवलाची आणि गंगाजळीची रकम १ लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कांहीं बँकांनीं रकम पुरी करून शेड्यूल्ड बँकांच्या यादींत प्रवेश मिळविला आहे. कांहीं बाबतींत ही गोष्ट ज्या मार्गांनीं घडवून आणलेली आहे, तो मार्ग त्या संस्थांची मजबुती वाढविण्यास सहायभूत होण्याजोगा नाहीं.

(५) ज्या बँकांची परिस्थिति चांगली आहे, अशा बँका आपले पैसे ठराविक प्रमाणांत रोखीनें बाळगतील, ह्याविषयीं कायद्यांत पुरेशी तरतूद आहे. तथापि, अडचणींत असलेल्या बँकांचे संबंधांतच खरी अडचण येते आणि त्यांच्या ठेवीदारांच्या हितरक्षणाचा प्रश्न उपस्थित होतो.

### रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या सुधारणा

(६) नियोजित बँकिंग ॲक्टांत बँकेनें खालील सुधारणा सुचविलेल्या आहेत:—बँकिंग कंपन्यांच्या व्यवहारांचें नियंत्रण; मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीस आळा; बँकांचें भरणा झालेलें भांडवल आणि रिझर्व्ह मिळून रकम किमान १ लक्ष रुपये असण्याची आवश्यकता. (बँकेस मुंबई आणि कलकत्ता येथें व्यवहार करावयाचा असल्यास प्रत्येक ठिकाणासाठी ५ लक्ष रुपये, १ लक्ष लोकवस्तीच्या ठिकाणीं काम करावयाचें असल्यास प्रत्येक ठिकाणाबाबत २ लक्ष रुपये; आपल्या प्रांताबाहेर अगर संस्थानाबाहेर काम करावयाचें असल्यास २० लक्ष रुपये ह्याप्रमाणें भांडवल व गंगाजळी मिळून पाहिजे. तथापि, २० लक्षांपेक्षा अधिक भांडवलाची आणि गंगाजळीची अपेक्षा केली जाणार नाहीं); आपल्या देण्यांच्या किमान ३०% रकम रोख अगर सरकारी रोख्यांत रोज धारण करण्याची सक्ती. (हे रोखे कोठेंहि तारण म्हणून ठेवतां कामा नयेत.) हे नियम बँकिंगचा कायदा अमलांत आल्यानंतर दोन वर्षांचे आंत पाळण्यास प्रारंभ झाला पाहिजे.

## स्वदेशांतील परदेशी बँका

हिंदुस्थानांतील बँकांच्या व्यवहारांत परदेशी बँकांचा फार मोठा भाग आहे. परदेशांशीं होणारा सर्व व्यापार एक्सचेंज बँकांचे मार्फत होतो, त्या सर्व बँका विदेशी आहेत. ह्या देशांत व्यवहार करणाऱ्या एकंदर १८ परदेशी एक्सचेंज बँका आहेत, त्यांतील चार बँकांची थोडक्यांत माहिती खालीं दिली आहे.

### चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया ॲंड चायना

ह्या बँकेची स्थापना १८५३ मध्यें लंडनमध्यें झाली. ब्रिटिश हिंदुस्थान, चीन, जपान, सयाम, मलाया आणि डच ईस्ट इंडीज येथें ह्या बँकेच्या चाळीसांवर शाखा आहेत. चीनमध्यें बँकेला नोटा काढण्याचा परवाना आहे. १ फेब्रुवारी, १९३९ पासून पी. ॲन्ड ओ. बँकिंग कॉर्पोरेशनचा कारभार ह्या बँकेनें आपणाकडे घेतला आहे.

१९३७ सालीं चीन-जपानचें युद्ध सुरू झाल्यापासून बँकेचा व्यवहार बराच कमी झाला; त्यांतच सरकारी कर्जरोख्यांची किंमत घसरली या कारणांनीं भाग भांडवलावरील डिव्हिडंड १४% वरून १०% आलें. बँकेचें वसूल केलेलें भांडवल चार कोटि रुपये असून कायम व अल्प मुदतीच्या ठेवी साठ कोटि रुपयांच्या आहेत. बँकेच्या गुंतविलेल्या ३४ कोटि रुपये भांडवलापैकीं तीन कोट रुपये पी. ॲंड ओ. बँकिंग-कॉर्पोरेशनमध्येंच गुंतलेले आहेत.

### ईस्टर्न बँक

ह्या बँकेची स्थापना १९०९ मध्यें लंडन येथें झाली. वसूल केलेलें भांडवल एक कोट रुपयांचें असून कायम व अल्प मुदतीच्या ठेवी दहा कोटि रुपयांच्या आहेत. गेल्या वर्षी एकंदर व्यापारांत घट झाली त्याचा परिणाम बँकेच्या व्यवहारावर होऊन डिव्हिडंड ७% वाटण्यांत झाला. १९३४ पर्यंत ९% डिव्हिडंड होतें; १९३५ तें ८% झालें त्यानंतर तें ७% कायम आहे.

### मर्कन्टाइल बँक ऑफ इंडिया

ह्या बँकेची स्थापना १८९२ त लंडन येथें झाली. वसूल झालेलें भांडवल एक कोट रुपयांवर असून कायम व अल्प मुदतीच्या ठेवींची रकम वीस कोटि रुपयांवर आहे. बँकेचीं ३३ एजन्सी व ब्रँच ऑफिसें आहेत. त्यांतील ११ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या ठिकाणीं आहेत. गुंतविलेलें भांडवल व कर्जाऊ दिलेलें भांडवल यांचें प्रमाण समसमान आहे हें या बँकेचें वैशिष्ट्य आहे. १९३१ पासून बँकेचा डिव्हिडंडचा दर १२% कायम आहे.

### नॅशनल बँक ऑफ इंडिया

ह्या बँकेची स्थापना कलकत्ता येथें १८६३ मध्यें करण्यांत आली व १८६६ त लंडन येथें तिची नोंदणी झाली. बँकेचें वसूल भांडवल तीन कोटि रुपये असून, कायम व अल्प मुदतीच्या ठेवींची रकम ४५ कोटि रुपयांवर आहे. बँकेच्या २९ शाखा असून त्यांतील दहा आफ्रिकेंत आहेत. ठेवींवर देण्यांत येणाऱ्या व्याजाचे दर कमी करावे लागल्यापासून अल्प मुदतीच्या सरकारी रोख्यांत गुंतलेल्या रकमेचा आकडा बराच वाढला आहे.

१९२२ पर्यंत डिव्हिडंडचा दर २०% होता; त्यानंतर तो १८% करण्यांत आला. १९२८ मध्यें तीन लक्ष रुपये अधिक कर भरावा लागला; तसेंच रिझर्व्ह फंडांत वाढ करण्यांत आल्यामुळें डिव्हिडंडचा दर १६% वर आणण्यांत आला.

# स्फुट विचार

## रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी

पांच वर्षांमागें रिझर्व्ह बँक स्थापन झाली तेव्हां तिच्या भागांची वाटणी विशिष्ट प्रमाणांत देशाच्या पांच विभागांत करण्यांत आली. अधिकांत अधिक लोकांच्या हातांत बँकेचे भाग रहावे आणि सर्व प्रांतांस त्यांचा योग्य हिस्सा मिळावा हा या वाटणीचा उद्देश होता. थोड्या भागीदारांच्या हातीं बँकेची सत्ता जाऊं नये हाहि हेतु त्या योजनेच्या मुळाशीं होता. तथापि, बँकेच्या भागांची खरेदी-विक्री खुल्या बाजारांत होणें अपरिहार्य असल्यामुळें मूळच्या वाटणींत महत्त्वाचा बदल होऊन मुंबई प्रांताकडे त्यांचा ओघ वहात राहिला आहे आणि भागांची मालकी थोड्या लोकांच्या हातीं जात आहे असें अगदीं अलीकडच्या माहितीवरून आढळून येतें. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचे वेळीं भागीदारांची एकूण संख्या ९२ हजार होती आणि एकूण पांच लक्ष भागांपैकी १,४०,००० मुंबईत, १,४५,००० कलकत्यांत, ११५,००० दिल्लींत, ७०,००० मद्रासमध्यें व ३०,००० रंगूनमध्यें होते. रिझर्व्ह बँकेच्या भागांची उलाढाल विस्तृत प्रमाणांत होत आल्याकारणानें ही वाटणी पार बदलून गेली आहे. भागीदारांची संख्या सध्या ५९,७७७ आहे. मुंबई विभागांत प्रारंभीं १,४०,००० भाग होते, त्यांची संख्या आतां २,०५,००० पर्यंत गेली आहे. कलकत्त्यांतले भाग कमी होऊन ते आतां १,२२,८०० आहेत. दिल्लींत ९३,३००; मद्रासमध्यें ५९,९५५ व रंगून येथें १८,४२७ याप्रमाणें घट झाली आहे. ह्या प्रवृत्तीस आळा घालून भागीदारांची संख्या घटणार नाहीं अशी व्यवस्था सरकारनें केली पाहिजे, अशा प्रकारची सूचना करण्यांत आली आहे. ज्यास्तींत ज्यास्त लोकांच्या हातीं रिझर्व्ह बँकेचे भाग रहावे ह्यासाठी एका व्यक्तीस अमूकच मर्यादेपर्यंत भाग धारण करतां येतील असा निर्बंध घालण्यांत यावा अशी एक कल्पना पुढें मांडण्यांत आली आहे. भागांच्या खरेदी-विक्रीचें स्वातंत्र्य कायम राहून देशाच्या निरनिराळ्या विभागांत त्यांची योग्य वाटणी व्हावी हा हेतु कसा सफल करावा, हा येथें प्रश्न आहे.

## वऱ्हाडांतील सेंट्रल बँका

वऱ्हाडांतील १२ मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी आतां ११ बँका बंद आहेत. गेल्या दहा वर्षांतील वाईट पीक, शेतीच्या मालास आलेली अल्प किंमत आणि जमिनींच्या किंमतींत पडलेली प्रचंड घट, ह्यांमुळें थकबाकीचें प्रमाण भयंकर वाढलें आणि आपली बाकी वसूल करण्याकरितां बँकांस नाइलाजानें हजारों एकर जमीन आपल्या ताब्यांत घ्यावी लागली. ठेवीदारांच्या ठेवी परत करणें बँकांस साहजिकच कठीण झालें. त्यांस नवीन पैसा मिळेना आणि आपल्या ताब्यांत घ्याव्या लागलेल्या जमिनींची व्यवस्था पहाणेंहि त्यांस दुष्कर झालें. तेथील सहकारी चळवळीस अशा रीतीनें कठीण अवस्था प्राप्त झाली. ठेवीदारांचे पैसे अडकून पडले, ते त्यांस परत मिळण्याचा मार्ग खुंटला. प्रांतिक बँका आणि इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या प्रतिनिधींची मद्रास येथें परिषद भरली होती, तिनें वऱ्हाडमधील सहकारी चळवळीबाबत योजनेचा विचारविनिमय करून आपल्या स्वतःच्या सूचना मध्यप्रांत आणि वऱ्हाड सरकारास सादर केल्या. ठेवीदारांस त्यांच्या ठेवींपैकी रुपयांत ६ आणे परत करण्यांत यावे आणि सेंट्रल बँकांचीं इतर देणीं फिटलीं म्हणजे त्यांचे देवींचे प्रमाणांत त्यांस पुनः रकम मिळावी; बँकेच्या ताब्यांतील जमिनींची किंमत वाढण्याची वाट पाहून नंतर बाकीची रकम त्यांस मिळावी आणि सहा आण्यांच्या पहिल्या हप्त्याच्या तरतुदीसाठी सरकारनें १५ लक्ष रुपये द्यावेत, अशी ही योजना आहे. वऱ्हाडांतील कांहीं सहकारी कार्यकर्त्यांनीं ही योजना प्रांतिक गव्हर्नरापुढें मांडली आणि ह्याबाबत त्वकर तजवीज होण्याची आवश्यकता त्यांचे निदर्शनास आणली. ह्या मध्यवर्ती बँका संकटांत आल्या त्यावेळीं सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारचें ज्यांनीं काम केलें, त्यांचेवर दावा आणण्यासाठी गव्हर्नरांची परवानगी एका ठेवीदारानें मागितली आहे.

## इंपीरिअल बँकेचा व्याजाचा दर वाढला

इंपीरिअल बँकेचा सरकारी कर्जरोख्यांच्या तारणावर द्यावयाच्या कर्जाच्या व्याजाचा दर तीन टक्क्यांचा साडेतीन टक्के केला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रिझर्व्ह बँक अस्तित्वांत आल्यापासून तिचा "बँक रेट" ह्या देशांत प्रमाणभूत मानण्यांत येतो. मध्यवर्ती बँक ह्या नात्यानें नोटा प्रचलित करून अथवा त्यांचें प्रमाण कमी करून चलन वाढवणें अथवा मर्यादित करणें हें तिचें काम आहे आणि देशांतील इतर बँकांच्या शिलका तिच्याजवळ रहातात व त्यांस तिच्याकडून कर्जाऊ रकमा मिळूं शकतात त्या कारणानें आपला व्याजाचा दर चढवणें किंवा खालीं करणें ह्या साधनानें तिला व्यवहारांत खेळणाऱ्या पैशाचें निरसन करतां येतें. रिझर्व्ह बँकेच्या व्याजाच्या दरास विशेष महत्व आहे तें ह्यामुळेंच होय. तिचें काम एजंट म्हणून इंपीरिअल बँक ऑफ इंडिया करते आणि तिच्याकडे कर्जाविषयींच्या मागण्या अधिक येऊं लागल्यामुळें तिला स्वतःचा व्याजाचा दर अर्धा टक्क्यांनीं चढवावा लागला आहे. बाजारांत पैशाची चणचण आहे हें ह्यावरून उघड होत आहे. तथापि रिझर्व्ह बँकेनें आपला दर अजून वाढवलेला नाहीं यावरून आवश्यक वाटणारा पैसा पुरवण्याचें सामर्थ्य आपणांस अबाप आहे असें तिला वाटत आहे, हें स्पष्ट आहे. हिंदी कच्च्या मालाचा उठाव होण्यास आतां प्रारंभ झाला आहे. हिंवाळा हा ह्या परिस्थितीचा हंगाम आहे. अशा वेळीं बाजारांत पैशाची चणचण नेहमीच होत असते. ह्या हंगामांत बँकांकडे पैशाची मागणी निकडीची व मोठ्या प्रमाणांत होते आणि त्यांस व्याजाचा दर चढवावा लागतो. मुंबईच्या बाजारांत अलीकडे चांदीची खरेदी विस्तृत प्रमाणांत झाली असून तिच्या तारणावर मोठ्या रकमा उचलल्या गेल्या आहेत. युद्धामुळें बाजारभाव सामान्यतः चढल्याचाहि पैशाविषयींच्या मागणीवर परिणाम होणें स्वाभाविक आहे. पैशाच्या चणचणीची परिस्थिति किती वेळ टिकते आणि तिच्या बाबतींत रिझर्व्ह बँकेस कोणतें धोरण स्वीकारावें लागतें तें पहावें.

## अनाथ विद्यार्थि गृहाची महाराष्ट्र डायरी आणि कॅलेंडर

अनाथ विद्यार्थि गृहाची १९४० सालची महाराष्ट्र रोजनिशी नेहमीप्रमाणें भरपूर माहितीनें परिपूर्ण असून ती स्वदेशी कागदावर छापलेली आहे. संस्थेचें दिनदर्शकहि उपयुक्त आहे. संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या ह्या दोन्ही आवश्यक गोष्टी लोकांनीं विकत घेतल्यास नफ्याचा विनियोग गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे होईल.

## बॉंबे इंजिनिअरिंग कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन

( लि. आं. म. )

मुंबई येथें डिसेंबर तारीख १३ ते १६ पर्यंत बॉंबे इंजिनिअरिंग कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन झालें. अधिवेशनास शंभराचे वर सभासद उपस्थित होते.

बॉंबे इंजिनिअरिंग कॉंग्रेस सुरू होऊन यंदा पंचवीस वर्षे झालीं. म्हणून यंदाचें अधिवेशन विशेष उत्साहाचें झालें. गेल्या पंचवीस वर्षांतील इंजिनिअरिंगमधील मुंबई इलाख्याची प्रगति दर्शविणारे लेख त्या त्या शाखेच्या तज्ज्ञांकडून लिहून घेऊन कॉंग्रेसनें यंदा एक रौप्य महोत्सव अंक प्रसिद्ध केला आहे.

अधिवेशनाचें उद्घाटन सुरू करण्यास मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लमले उपस्थित होते. त्यांस महोत्सव अंकाची पहिली प्रत नजर करण्यांत आली.

### रौप्य महोत्सव अंक

या पुस्तकांत मुंबईचे सिटी इंजिनिअर श्री. मोडक यांनीं मुंबई शहरांतील इंजिनिअरिंगच्या शाखांची व उपशाखांची प्रगति फारच मार्मिकपणें व थोडक्यांत आंकड्यानिशी दिली आहे. त्यावरून शहराचे सुधारणेंत गाजावाजा न करतां इंजिनिअर मंडळींचा हात किती प्रामुख्यानें असतो तें दिसून येईल. पी. डब्ल्यू. डी. मधील सुपरिटेंडिंग इंजिनिअर श्री. दफ्तरी यांनीं रस्ते व पूल यावर लेख लिहून हातीं असलेल्या थोड्या पैशांत शक्य तितके उपयुक्त रस्ते व पूल बांधण्याची इंजिनिअरिंग खात्यानें कशी पराकाष्ठा केली आहे तें दाखविलें आहे. झपाट्यानें वाढलेल्या मोटारवाहतुकीपुढें पैशाच्या अभावीं कोणीहि इंजिनिअर आला तरी काय करूं शकणार ? पुण्याचे रावसाहेब जोशी यांनीं त्यांचा आवडता विषय पाणीपुरवठा यावर लेख लिहिला आहे. गुजरातमध्यें महाराष्ट्रांतील कांहीं जिल्ह्याइतका दुष्काळ नाहीं व तेथें पाणीपुरवठा वाढवावयाचा म्हटलें तर सक्कर धरणाइतका खर्च येणार. कोंकणांतीलहि पुष्कळ भाग पाणी पुरवठ्याच्या वाढीच्या लायकीचा नाहीं. परंतु मावळाचे पूर्वेकडील दुष्काळी भाग हा गरजेचे दृष्टीनेंच केवळ नव्हे तर भौगोलिक रचनेनें सुद्धा पाटबंधाऱ्याच्या कामास कसा योग्य आहे तें लेखकानें दाखविलें आहे. सरकारास मात्र केलेल्या खर्चावरचें व्याजसुद्धा उत्पन्नांतून भागवितां येत नाहीं. विश्वेश्वर अय्या कमिटीच्या शिफारशी सरकार लवकरच अमलांत आणणार आहे. महाराष्ट्रांतील साखरेचे कारखाने व इतर सुधारणांमुळें जेमतेम व्याजाची तोंडमिळवणी झाली तरी पुष्कळच काम झालें असें लेखकानें मत व्यक्त केलें आहे.

निवृत्त डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज मि. भरूचा यांनीं एक फारच मार्मिक लेख लिहिला आहे. हिंदी कारखानदार अदूरदृष्टीनें वागून स्वतःचे लाखो रुपयांचें नुकसान कसें करून घेतात या बाबतींत मि. भरूचा यांना ठिकठिकाणीं अनुभव आला आहे. तज्ज्ञांचा सल्ला न घेता कोणा तरी फिटरला विचारून वाटेल ती मशिनरी घ्यावयाची व शेवटीं ती फार खर्चाची पडावयाची हा रोजचा अनुभव आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्यें हल्लीं किती प्रगति झाली आहे व योग्य तज्ज्ञाचा सल्ला न घेतल्यामुळें कशी फसगत होते याबद्दलची हिंदी कारखानदारांची खात्री जेव्हां होईल तेव्हां होवो. कूपर यांचें 'हिंदुस्थान' एंजिन व किर्लोस्कर यांचें इंजिन या दोन्ही देशी क्रूड ऑईल इंजनांचा मि. भरूचा यांनीं अभिमानानें उल्लेख केला आहे. पुण्याचे श्री. जोगळेकर यांनीं व्हेजिटेबल तेलासंबंधीं चालविलेलें संशोधन उत्तेजनार्ह असल्याचें मि. भरूचा यांनीं नमूद केलें आहे. हें पुस्तक तयार करण्यास कॉंग्रेसचे सेक्रेटरी श्री. गोळवाला व श्री. सी. बी. जोशी यांनीं बरेच श्रम घेतले.

### निबंध वाचन

कॉंग्रेसचे अधिवेशनांत यंदा चार सभासदांनीं निबंध वाचले. साताऱ्याचे श्री. जी. आर. वर्तक यांनीं 'खेडेगांवी स्वस्त रस्ते' या विषयावर स्वानुभवानें भरलेला असा विचारपूर्ण निबंध वाचला. प्रत्येक जिल्ह्यामध्यें एकएक तालुक्यांत आदर्श रस्तेआखणी करून रस्ते बांधावे म्हणजे लोकांना त्यापासून तावडतोब फायदा झाल्याचें नजरेस येईल व मुख्य रस्त्यांस जोडणारे रस्ते सहकारी पद्धतीनें बांधण्यास त्यांची मदत होईल असें श्री. वर्तक यांनीं प्रतिपादन केलें. दुसरा निबंध पुण्याचे तरुण व उत्साही इंजिनिअर श्री. जी. व्ही. वर्तक यांनीं वाचला. सिमेंट कांक्रीटचे पुलाचे गर्डर काय आकाराचे असावेत या बाबतींत सर्वसाधारण एक नियम नसून सिमेंट, खडी व रेती व लोखंड यांच्या बाजारांतील भावाप्रमाणें त्यांची कमी-जास्त प्रमाणांत योजना करून तितक्याच मजबुतीचा गर्डर कसा बनवता येतो हें त्यांनीं गणितांनीं सिद्ध करून दाखविलें. त्याबाबतींत लवकर उत्तर मिळण्याकरतां तयार केलेले आलेख त्यांनीं समजावून दिले. पुण्याचे रावसाहेब जोशी यांनीं पाणी मोजण्याचें साधन या विषयावर एक अत्यंत तात्त्विक निबंध वाचला; व या विषयावर आजवर असलेल्या समजुती कशा चुकांच्या आहेत तें त्यांनीं दाखवून दिलें व आपल्या नवीन कल्पनेची रूपरेखा मांडली. श्री. सप्रे यांनीं अहमदाबाद येथील ट्यूब विहिरी या विषयावर निबंध वाचला. त्यांचा निबंध माहितीनें पूर्ण भरलेला होता.

पुण्याचे दि. ब. शेटे हे पुढील अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले गेले. पुण्याचे रावसाहेब जोशी यांस गतवर्षाच्या निबंधांतील उत्कृष्ट निबंधाबद्दल गव्हर्नरांचे हस्तें पदक नजर करण्यांत आलें.

---

### नवीन पुस्तकें

१९४० ची सुरुवात आर्थिक विभागानें "इंटरनॅशनल ट्रेड स्टॅटिस्टिक्स १९३८" "बॅलन्सेस ऑफ पेमेन्टस १९३८" "अर्बन ॲन्ड रुरल हाउसींग" व कच्च्या मालासंबंधीं माहिती देणारें एक पुस्तक हीं प्रसिद्ध केलीं आहेत. आरोग्य विभागानें खेडेगांवांतील जीवनाची युरोपियन राष्ट्रांची राष्ट्रवार माहिती व युरोपांतील आहारविषयक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.

---


## जाहिरात

पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह लॅन्ड मॉर्गेज बँक लि.
लक्ष्मीरोड पुणें २

या बँकेच्या मॅनेजरची जागा भरावयाची आहे. अर्जदारास सहकारी बँकेच्या व्यवहाराची माहिती असावी. अर्जदारांनीं लायकी, किमान पगाराची अपेक्षा, व पूर्वीचा अनुभव यासह सविस्तर अर्ज ता. २० जानेवारी १९४० चे पूर्वी करावेत.

चेअरमन,
पुणें जि. को. लॅन्ड मॉर्गेज बँक लि.

ता. १०-१-१९४०.

## अलाहाबाद् येथील तेविसावी आर्थिक परिषद्

हिंदी आर्थिक मंडळाच्या वतीनें प्रतिवर्षी भरणाऱ्या परिषदेचें यंदाचें अधिवेशन ता. २ ते ५ जानेवारी ह्या दिवशीं अलाहाबाद विश्वविद्यालयामार्फत भरलें होतें. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व विश्वविद्यालयांचे प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते. युद्धकालीन आर्थिक व्यवहार, चलनपद्धतींत अलीकडे होत असलेले फेरबदल, मजूर व भांडवलवाले ह्यांमधील तंटे, आणि अर्थशास्त्राचें योग्य क्षेत्र ह्या महत्त्वाच्या विषयांचा परिषदेंत ऊहापोह केला गेला. यंदाच्या अधिवेशनांत पंडित जवाहरलाल नेहरू हे कॉंग्रेस पुढारी व डॉ. ग्रेगरी हे हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार ह्यांनीं भाग घेतल्याकारणानें परिषदेच्या कामांत विशेष उत्साह निर्माण झाला होता.

### अर्थशास्त्र व राष्ट्रीय जीवन

अलाहाबाद् विश्वविद्यालयाचे प्रमुख डॉ. अमरनाथ झा ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत अर्थशास्त्रज्ञांनीं केवळ पुस्तकी पांडित्यामागें न लागतां सामाजिक उन्नतीला पोषक होण्याचा प्रयत्न करावा असें आग्रहानें प्रतिपादिलें. परिषदेचें उद्घाटन करतांना पंडित जवाहरलाल ह्यांनीं शास्त्रीय ज्ञानाच्या अभावीं राजकारण लंगडें पडतें ही गोष्ट मान्य केली, व हिंदुस्थानचें आर्थिक ध्येय ठरवून तें गांठण्याचे निश्चित मार्ग परिषदेनें सुचवावे असें सांगितलें. यांत्रिक धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याखेरीज राष्ट्राचें संरक्षण होणार नाहीं, व लहान-सहान खेडेगांवीं धंद्यांसहि जरूर तें उत्तेजन मिळणार नाहीं असें आपलें ठाम मत असल्याचें पंडितजींनीं सांगितलें. रशियांत व्यक्तिस्वातंत्र्यास हानिकारक आणि इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या ज्या अनेक घडामोडी अलीकडे होत आहेत त्या आपणांस पूर्णपणें अमान्य असूनहि एकंदरीनें राष्ट्राचें आर्थिक जीवन समाजसत्तेच्या नियंत्रणाखालीं असणें आपणांस योग्य वाटतें असा पंडितजींनीं निर्वाळा दिला. परिषदेचे अध्यक्ष डॉ. जैन हे होते. त्यांनीं हिंदी आर्थिक प्रगति समाजसत्तावादी अगर भांडवलशाही ह्यांपैकीं कोणत्याहि एका प्रकारची न होतां दोहोंमधील चांगल्या गोष्टींच्या समन्वयानें व्हावी असें सांगितलें. परिषदेमध्यें अर्थशास्त्राच्या वाजवी क्षेत्राबद्दल जे निबंध वाचले गेले त्यांमध्यें अर्थशास्त्रज्ञांनीं आर्थिक व्यवहाराशीं निकट संबंध ठेवून राष्ट्रीय प्रगतीस हातभार लावावा असेंच मत दिसून येत होतें.

### बाजारभावांची वाढ

युद्धामुळें निर्माण झालेल्या परिस्थितींत हिंदुस्थाननें कोणतें आर्थिक धोरण स्वीकारणें इष्ट आहे ह्या प्रश्नाचा उहापोह होत असतां बाजारभावांच्या वाढीकडे विशेष लक्ष्य जाणें साहजिक होतें. हिंदी मालास मागणी वाढल्यानें बाजारभावांत झालेला चढ हा नैसर्गिक व एकंदरीनें हितावहच आहे असें सार्वत्रिक मत दिसून आलें. डॉ. ग्रेगरी ह्यांनीं त्याच मतास दुजोरा दिला व इतके दिवस शेतकऱ्यांस बाजारभावाच्या मंदीमुळें भोगावे लागलेले हाल आतांच कोठें दूर होऊं लागले असतां बाजारभावांचें नियंत्रण करणें योग्य नाहीं असें सांगितलें. शिवाय किंमतीचें नियंत्रण करणें ही गोष्टहि हिंदुस्थानांत विशेष सोयीची नसल्यानें, एकंदरीनें किंमतीचें नियंत्रण करण्यापेक्षा चांगल्या व माफक दरानें मिळणाऱ्या मालाचाच पुरवठा करण्याकडे अधिक लक्ष देणें इष्ट आहे ह्या गोष्टीवर त्यांनीं भर दिला. बाजारभावाबद्दल जें काय धोरण ठरवावयाचें तें सर्व देशभर एकच असावें व युद्धानंतर भाव एकदम उतरण्याची भीति आहे त्यासंबंधीं आतांपासूनच उपाययोजना करून ठेवावी हेहि मुद्दे परिषदेपुढें विशेष जोरानें मांडले गेले.

### चलनपद्धतींतील आधुनिक सुधारणा

बहुतेक सर्व राष्ट्रांत सोन्याचें चलनपद्धतींतून उच्चाटन झालेलेंच आहे. आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या तोंडमिळवणीस व हुंडणावळीच्या स्थिरतेस अजून सोन्याचा उपयोग होत आहे. हळूहळू ह्याहि क्षेत्रांतून सोन्याचें उच्चाटन होऊन एखाद्या सर्वराष्ट्रीय पेढी अगर संस्थेमार्फत व्यापारी देणीघेणीं भागविलीं जाण्याचा संभव आहे असें एक मत परिषदेपुढें मांडण्यांत आलें होतें. निवळ तात्त्विक दृष्ट्या हें मत बरोबर असलें तरी आंतरराष्ट्रीय सहकार्य एवढ्या महत्त्वाच्या कामीं आजच घडून येईल असें वाटत नाहीं. त्यांतल्या त्यांत जीं राष्ट्रें परस्परांशीं सलोख्यानें वागतात त्यांमध्यें विशिष्ट बाबींपुरतां करार होणें शक्य आहे. ब्रिटिश साम्राज्याशीं संलग्न असलेले देश व इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्यांमध्यें अशा तऱ्हेचे करार आतांच झालेले आहेत. परंतु चलनविषयक करारांच्या पुढील एकीकरणाची पायरी आजच गांठणें संभवनीय दिसत नाहीं. प्रत्येक राष्ट्रानें स्वतःच्या राजकीय ध्येयास अनुसरून आपलें आर्थिक धोरण ठरवावयाचें असतें, व ह्या आर्थिक धोरणास पोषक होईल अशीच चलन व हुंडणावळ ह्यांची संघटना केली पाहिजे. जगाच्या सध्याच्या राजकीय परिस्थितींत प्रत्येक राष्ट्रास चलनविषयक स्वायत्तता असणें अगदीं जरूर आहे.

हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार, डॉ. ग्रेगरी, ह्यांस हें मत अर्थातच मान्य नव्हतें. परंतु हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या बहुमतें स्वायत्ततेच्या धोरणासच पाठिंबा मिळत होता. बहुतेक राष्ट्रांत चलन व हुंडणावळ ह्यांबद्दलचा सर्व कारभार हल्ली सरकारच्या एका खात्याकडे दिलेला असतो व मध्यवर्ती पेढीच्या सहकार्यानें सरकार आपलें चलनविषयक धोरण अंमलांत आणतें. ही परिस्थिति समाधानकारक अगर टिकणारी नाहीं. सर्व अधिकार एक पेढीकडे तरी रहावे, किंवा सरकारकडे रहावे, असें म्हणणाऱ्यांच्या पक्षाचें नेतृत्व डॉ. ग्रेगरी ह्यांचेकडे होतें. सध्याची पेढी व सरकार ह्यांची जोड घटना परिस्थितीनें निर्माण झालेली असल्यानें जगांतील अस्थिर आर्थिक व राजकीय वातावरण निवळल्याखेरीज ती बदलणार नाहीं, हें उघड आहे. शिवाय एकंदर पेढ्यांचा व्यवहार, विशेषतः मध्यवर्ती पेढीचा कारभार, राष्ट्रीय सरकारच्या प्रत्यक्ष हुकमतीखालीं आणावा अशी चळवळ चालू असल्यानें शेवटीं पेढी व सरकार ह्यांमध्यें भेद मानण्याचेंहि कारण रहाणार नाहीं.

### मजूर व भांडवलवाले

हिंदी अर्थशास्त्रज्ञांमधील बराच मोठा वर्ग मजूरविषयक प्रश्नांकडे आस्थेनें व आपलेपणानें लक्ष्य देत असतो हें यंदा वाचलेल्या अनेक निबंधांवरून दिसून आलें. मजुरांस किमान वेतन ठरविण्याच्या बाबतींत तात्त्विकदृष्ट्या एकमतच होतें. परंतु किमान वेतन व जीवनास आवश्यक वेतन ह्यांमध्यें आपल्या देशांत एक विशेष दुःखकारक फरक दिसून येतो. राष्ट्रीय संपत्तीचें मान अगदी निकृष्ट असल्यानें कारखानदारीखेरीज इतर रोजगारांत व

शेतींत मजुरांस मिळणारें सरासरी वेतन हें जीवनास आवश्यक असलेल्या मजुरीहूनहि कमी असतें. सरासरी वेतनाहून किमान वेतन अधीक ठेवल्यास त्याचा अंमल होणें कठीण जाईल, हें उघड आहे. तरी निदान आवश्यक वेतन मिळाल्याखेरीज मजुरांची कार्यक्षमताहि वाढणार नाहीं, हें ध्यानांत घेतां आवश्यक गरजा भागविण्यास पुरेल एवढें तरी वेतन कारखान्यांतील प्रत्येक मजुरास मिळण्याची व्यवस्था होणें इष्ट असल्याचें बहुतेकांस मान्य होतें.

कायद्यानें कोणतेंहि वेतन ठरविलें तरी त्याचा अंमल मजूर चळवळीच्या जोमदारपणावरच अवलंबून असणार. मुंबई सरकारनें मालक व मजूर ह्यांचे तंटे तोडण्याची जबाबदारी बहुंशीं आपल्या अंगावर घेतली हें योग्य आहे असा सार्वत्रिक सूर होता. परंतु भांडणें सरकारपुढें येण्यापूर्वीच तीं मजूर व मालक ह्यांच्या सहकार्यानें मिटविण्याकडे दुर्लक्ष होणें इष्ट नसल्याचें कांहीं निबंधांत नमूद करण्यांत आलें होतें. तसेंच, शेवटीं मजूर संघांस सरकारी लवादांचा निवाडा अयोग्य वाटल्यास संप करण्याचा अधिकार असावा व तो सध्या मुंबईप्रांतांत देण्यांत आला आहे त्याहून अधीक विस्तृत असावा असें मत प्रदर्शित होत होतें. मजूर संघांस मान्यता देण्याचे बाबतींत मुंबईतील नव्या कायद्याचें धोरण वाजवीपेक्षा जास्त सावधगिरीचें असल्याबद्दलहि जोरानें तक्रार करण्यांत आली. संप पुकारण्याचा हक्क व मजूर संघांस मान्यता ह्या दोन बाबतींत अधिक उदार धोरण ठेवल्यास मुंबईचा कायदा इतर प्रांतांनीं अनुकरण करण्यासारखा आहे असें सार्वत्रिक मत दिसलें.

### म्हैसूर परिषदेचे अध्यक्ष, प्रो. गाडगीळ

पुढील सालची परिषद् म्हैसूर येथें तेथील विश्वविद्यालयांत भरण्याचें ठरलें असून पुण्याचे प्रो. धनंजयराव गाडगीळ ह्यांस अध्यक्ष निवडण्यांत आलें आहे. परिषदेमध्यें पुढील विषयांवर निबंधवाचन व चर्चा होणार आहे:—(१) समाजसत्तावादी राष्ट्रांतील किंमतींचा प्रश्न. (२) हिंदुस्थानांतील शेतकीच्या मालाच्या किंमती; (३) प्रांतिक सरकार व संस्थानें ह्यांचें उत्पन्न व खर्च.

---

### कऱ्हाड येथील कृष्णेवरील पूल

कऱ्हाड येथील कृष्णा नदीवरील पुलामुळें कऱ्हाड आणि कऱ्हाड रेल्वे स्टेशन ह्यांमधील दळणवळण सुकर झालें आहे. पावसाळ्यांत कोकण किन्यान्यावरील आगबोटी बंद असतात, त्यावेळीं चिपळूण आणि विजापूर-रायचूर ह्यांस रस्त्यानें जोडण्यास हा पूल फार उपयोगी पडेल. पुलाची लांबी ९०२ फूट असून पूल २४ फूट रुंद आहे. नदीचे पातळीपासून पूल ४५ फूट उंच बांधण्याची पहिली योजना होती, परंतु पावसाळ्यांत पूर आल्यावर पूल शक्य तितका कमी वेळ बंद रहावा म्हणून पुलाची उंची ५ फुटांनीं वाढविण्यांत आली आहे. १९३५ सालीं पुलाचा नकाशा आणि खर्चाचा अंदाज ह्यांस मंजुरी मिळाली. जून, १९३६ मध्यें पुलावरून वहातूक सुरु झाली. गेल्या महिन्यांत पुलाची नीट परीक्षा करण्यांत आली. कऱ्हाड ते कऱ्हाड रेल्वे स्टेशन आणि तेथून पलीकडे ओगलेवाडी हा रस्ता कॉंक्रीटचा करण्याचें ठरलें असून त्यासाठी चालू वर्षांत ५० हजार रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

### अहमदनगर येथील स्त्रियांमधील जागृति

(लि. आ. म.)

फारसा गाजावाजा न करतां नगर येथील कांहीं स्त्रियांनीं एक सहकारी वस्तुभांडार चालविण्याचें ठरवून त्याप्रमाणें प्रत्यक्ष कामासहि सुरवात गेल्या अडीच महिन्यापासून करण्यांत आली होती व त्याबरोबरच हें वस्तुभांडार सहकारी सोसायट्यांचे कायद्याखालीं रजिस्टर करण्याची खटपट चालू होती. त्याप्रमाणें तें रजिस्टर होऊन आल्यावरून त्याचें कामकाज रीतसर चालू करण्यासाठी पहिली साधारण सभा मंगळवार ता. ९-१-४० रोजीं संध्याकाळीं ५॥ वाजतां श्री. गरुड वकील यांचे दिवाणखान्यांत भरली. सभेमध्यें सभासदांपैकीं १७ स्त्रिया हजर असून सहकारी खात्यातर्फे डिस्ट्रिक्ट ऑनररी ऑर्गनायझर रावसाहेब बेळणकर, ऑडिटर मि. झोपे, सब-ऑडिटर मि. पंडित व मि. शहापूरकर हे हजर होते. असिस्टंट रजिस्ट्रार साहेबांनीं मंजूर केलेले पोटनियम प्रथम स्वीकारण्यांत येऊन त्यानंतर चालू वर्षाकरितां ७ स्त्रियांचें एक कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणें निवडण्यांत आलें व आजपर्यंत झालेला व्यवहार वाचून तो स्वीकारण्यांत आला. सदरहू दुकानांत स्त्रियांना लागणारा सर्व देशी माल ठेवण्यांत येणार असून ही संस्था स्त्रियांकडूनच चालविण्यांत येणार असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारक्षेत्रामध्यें पाऊल टाकण्याची संधी स्त्रियांना मिळणार आहे.

#### कार्यकारी मंडळ

१ सौ. राधाबाई चितळे (अध्यक्ष)
२ सौ. सिंधुताई हिवरगांवकर
३ सौ. माणिकबाई पटवर्धन
४ सौ. हिराबाई भापकर
५ श्रीमती लक्ष्मीबाई देशपांडे
६ सौ. कमलाबाई गाडगीळ
७ सौ. चंपुताई साठे

---


## रक्तवर्धक.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि. या कंपनीनें 'रक्तवर्धक' या नांवाचें, पंडुरोग अथवा ॲनीमिया या रोगावर एक पेटंट औषध काढलें आहे. हिंदुस्थानांत ॲनीमिया अथवा पंडुरोग हा रोग बराच फैलावलेला आढळतो. प्राय: निरनिराळ्या आजारांपासून या रोगाचा प्रादुर्भाव होतो, व शरीरांतील रक्त कमी कमी होऊन मनुष्य खंगत जातो.

या दृष्टीनें 'रक्तवर्धक' हें औषध अत्यंत उपयुक्त ठरलें आहे. पुणें येथील शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये निरनिराळ्या पंडुरोग्यांवर हें औषध वापरून पाहातां प्रयोगाअंतीं असें सिद्ध झालें आहे कीं, 'रक्तवर्धक' चे योगानें दर आठवड्यास शरीरांत लक्षावधी नवीन रक्तकण उत्पन्न होऊन झपाट्यानें रोगी सुधारतात.

आपल्याकडे ॲनीमिया अथवा पंडुरोगावर आजपर्यंत असें औषध नव्हतें. आयुर्वेद रसशाळेनें रक्तवर्धक हें औषध काढून पंडुरोग या भयंकर रोगापासून समाजास वाचवलें आहे. जनतेनें याचा जरूर फायदा घ्यावा एवढेंच नव्हे तर डॉक्टर व वैद्य लोकांनीं रक्तवर्धकची जनतेस ओळख करून देऊन समाजकार्यही साधावें.

## लोकसंख्या आणि रहाणीचें मान

(मुंबई येथील रेडिओवर झालेलें प्रो. काळे ह्यांचें भाषण)

(२)

### हिंदुस्थानांत लोकसंख्या वाजवीपेक्षा अधिक आहे काय?

हिंदुस्तानांत दर माणशीं वार्षिक उत्पन्न ५० ते ७० रुपये आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. इंग्लंड, अमेरिका वगैरे पाश्चात्य राष्ट्रांसंबंधाचे आकडे त्याच्या आठपट ते वीसपट आहेत. आशिया खंडांतील जपानहि ह्या देशाच्या पुष्कळ पुढें आहे. ह्या उत्पन्नावर लोकांची रहाणी अवलंबून असल्यानें येथील सामान्य जनतेची आर्थिक परिस्थिति असमाधानकारक आहे हें अपरिहार्य आहे. हिंदुस्तानांत हवापाणी विविध प्रकारच्या पिकांस अनुकूल आहे; जमीन सुपीक आहे; सिंधु, गंगा, यमुना, नर्मदा, कावेरी अशा नद्या आहेत; जंगलें आहेत; निसर्गाची ह्याप्रमाणें देशावर कृपा आहे. निसर्गाच्या देणग्यांचा उत्पादक रीतीनें उपयोग करण्यास देशांत चाळीस कोटि प्रजा आहे. त्यांनीं संघटित व कार्यक्षम यत्न केल्यास ह्या सुवर्णभूमींत दारिद्र्य कां रहावें आणि जनतेच्या रहाणीचें मान खालच्या दर्जाचें कां असावें? हिंदी लोकांनीं आपल्या प्रयत्नानें उत्पन्न केलेल्या संपत्तीची वांटणी ह्या राष्ट्राच्या लोकसंख्येमध्यें होते. ही लोकसंख्या, देशाचा विस्तार, उत्पन्न होणाऱ्या संपत्तीचे परिणाम आणि जनतेची प्राप्ति यांच्या मानानें वाजवीपेक्षा अधिक आहे कीं काय? येथील रहाणीचें मान सुधारावयाचें असेल तर जमीन इत्यादि संपत्तीच्या उत्पादनाचीं साधनें तरी वाढलीं पाहिजेत, किंवा लोकसंख्या देशांत कमी झाली पाहिजे, किंवा लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें तिचें उत्पादन-सामर्थ्य वाढलें पाहिजे. ह्यांपैकी कोणत्या एका किंवा अधिक उपायांचा अवलंब करणें शक्य व इष्ट आहे असे प्रश्न येथें उद्भवतात आणि लोकसंख्या व रहाणीचें मान ह्यांचा परस्पर-संबंध काय आहे हें ध्यानांत येतें.

### लोकसंख्या वाढविण्याचे प्रयत्न—राजकीय कारणें

जगांत अलीकडे चाललेल्या घडामोडींकडे लक्ष दिलें असतां लोकसंख्येच्या संबंधांत दोन-तीन मनोरंजक गोष्टी लक्षांत येतात. पहिली गोष्ट अशी कीं, युरोपांत व चीनमध्यें चाललेल्या युद्धाच्या मुळाशी जर्मनी व जपान ह्या देशांत, तेथील लोकसंख्येस जीवनास लागणारीं साधनें अपुरीं होऊन नवीन प्रदेश व वसाहती असणें अपरिहार्य झालें हें कारण आहे, असें सांगण्यांत येतें. राष्ट्रांतील प्रजेचें रहाणीचें मान उच्च रहावें, निदान तें खाली जाऊं नये, ह्यासाठी त्यास जमीन आदिकरून संपत्तीच्या उत्पादन-साधनांचा योग्य पुरवठा झाला पाहिजे; म्हणजे, संपत्तीचीं साधनें व लोकसंख्या ह्यांचें परस्पर-प्रमाण योग्य राहिलें पाहिजे. हें प्रमाण प्रतिकूल झाल्यास एकाद्या राष्ट्रानें दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्राच्या प्रदेशाचा जबरीनें अपहार करणें हें न्याय्य व माणुसकीस धरून आहे काय हा प्रश्न वेगळा. लोकसंख्या वाढत चालली असतां तिचा ओघ वसाहतींसारख्या अवश्य पण निसर्गाच्या कृपेंतील दूरदूरच्या प्रदेशांकडे वळण्याची आवश्यकता मात्र युरोपियन राष्ट्रांस भासली आहे. हॉलंड, बेल्जम व जपान ह्यांसारख्या चिमुकल्या राष्ट्रांचा आर्थिक संसार वसाहतींच्या सहायानें चालला आहे. हिंदी मजुरांस स्वदेशांत पुरेसा वाव नसल्यामुळें सिलोन, मलाया, ब्रह्मदेश, फीजीबेटें, आफ्रिका वगैरे ठिकाणीं पोटासाठी जाणें प्राप्त झालें आहे. स्वतःची लोकसंख्या प्रमाणाबाहेर अधिक झाल्याची ओरड इटलीनेंहि केली आणि ॲबिसीनीया देश युद्ध करून जिंकला. जमिनीची सुधारणा करून आणि उत्पादनाची अन्य मार्गांनीं कार्यक्षमता वाढवून कोणत्याहि राष्ट्रास आपलें उत्पन्न वाढवतां येणें आणि लोकांच्या रहाणीचें मान खालीं जाऊं न देणें शक्य आहे. पण ह्या सुधारणेस मर्यादा आहेत आणि त्यांचें अतिक्रमण झालें असतां प्रगतीचा मार्ग खुंटतो असा अनुभवसिद्ध सिद्धांत आहे. जर्मनी व इटली ह्यांची लोकसंख्येच्या वाढीस आपल्या मर्यादित प्रदेशांत वाव नाहीं अशी एका बाजूनें ओरड चालली आहे आणि तेथील राज्यकर्त्यांचे प्रयत्न लोकसंख्येच्या वाढीस कृत्रिम उपायांनीं उत्तेजन देण्याचे दुसऱ्या बाजूनें चालले आहेत, हें चमत्कारिक आहे. ह्या विसंगतीचें कारण प्रामुख्यानें राजकीय असून आर्थिक नाहीं हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे.

### मनुष्य : साध्य व साधन

दुसरी महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हणजे फ्रान्समध्यें लोकसंख्येची वाढ खुंटली असून संततीची वृद्धि होण्यासाठी सरकार आयांस व उत्पादक विवाहांस उत्तेजन देत आहे. फ्रान्समध्यें शेती व उद्योगधंदे चालवण्यास लागणारें पुरेसें मनुष्यबळ उपलब्ध नाहीं आणि त्यासाठी मजूर बाहेरून आणावे लागतात. ग्रेटब्रिटनमध्येंहि संततीची वाढ होत आहे ती लोकसंख्याहि कायम रहाण्यास अपुरी होत असल्याची ओरड सुरू झाली आहे; म्हणजे लोकसंख्येची वाढ अधिक नको, कमी नको, अगदीं बेताची असली पाहिजे असें सामान्य मत आहे असा ह्याचा अर्थ होतो. हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं नुसती लोकसंख्या वाढणें म्हणजे राष्ट्राची कार्यक्षमता व उत्पादनसामर्थ्य वाढणें नव्हे. लोकसंख्या मोठी असूनहि एकादें राष्ट्र दुर्बल आणि पांचव्या प्रतीचें असूं शकेल, तर कमी संख्येचें एकादें राष्ट्र प्रबळ व तेजस्वी असणें शक्य आहे. बल केवळ संख्येंत नसून त्या संख्येच्या गुणांत व कार्यक्षमतेंत आहे. अर्थ किंवा संपत्ति मनुष्याच्या उपभोगासाठी आहे, पण त्या संपत्तीचा निर्माता व साधनहि मनुष्यच आहे, हा दुहेरी संबंध लक्षांत बाळगला पाहिजे. मनुष्यानें आपली उन्नति स्वतःच्या मनानेंच करून घ्यावयाची असल्यानें आणि तो स्वतः साध्य व साधन असल्यानें आपलें आर्थिक बळ वाढवणें व आपलें जीवित सुखमय करणें आपल्याच हातीं आहे ह्याचा त्यास विसर पडतां कामा नये.

### माल्थसचा सिद्धांत

संपत्ति व सुख मिळविण्याचीं साधनें मर्यादित व कष्टमय आहेत, आणि म्हणूनच लोकसंख्या व रहाणीचें मान ह्या विषयास महत्त्व प्राप्त झालें आहे हें सांगितलेंच आहे. ह्या संबंधांतला अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत सवाशें वर्षांच्या मागें माल्थस ह्या अर्थशास्त्रज्ञानें पुढें मांडला. जीवनास लागणाऱ्या वस्तूंच्या वाढीपेक्षा लोकसंख्येची वाढ कितीतरी पटींनीं अधिक झपाट्यानें होते आणि चरितार्थाचीं लोकांची साधनें अपुरीं पडल्यामुळें त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिति खालावणें अपरिहार्य आहे, हा त्याचा मुख्य सिद्धान्त होय. शेतीच्या उत्पादनाचीं साधनें व त्याची घटना अधिक कार्यक्षम करून साधनांच्या मानानें उत्पादन कांहीं मर्यादेपर्यंत वाढवतां येतें हें खरें, पण त्या मर्यादेच्या पलीकडे अधिक श्रमास त्या मानानें फळ मिळत नाहीं, हें तितकेंच खरें

आहे. ह्या दृष्टीनें पहातां माल्थसच्या सिद्धांतांत सत्य आहे ह्यांत शंका नाहीं. लोकसंख्येची वाढ व उदरनिर्वाहाच्या साधनांची वाढ ह्यामध्यें अंतर पडलें असतां मनुष्याचें जीवित दुःखमय होऊं द्यावयाचें नसेल तर संख्येच्या वाढीस आळा घालण्याचा उपाय योजणें अपरिहार्य होतें. असें न झाल्यास लोकांत दारिद्र्य पसरतें; रोगांचा प्रसार होतो; युद्धें उपस्थित होतात आणि शेवटीं मृत्यु-संख्या वाढून लोकसंख्या व जीविताचीं साधनें ह्यांचा मेळ पुन्हां बसतो असें माल्थसचें म्हणणें आहे. परंतु माणसांनीं निसर्गाचे दास न होतां स्वतःच आपल्या संततीस प्रौढ विवाह आणि नैतिक बंधनें ह्यांच्या सहायानें मर्यादा घालावी असें त्याचें सांगणें आहे. निसर्गाचा जुलूम सहन करण्यापेक्षा मनुष्यांनीं संततीचा विस्तार प्रमाणाबाहेर होणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी अशी त्याची सूचना आहे. (रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें)

## आमच्या अपेक्षा

—१—

आम्हीं म्हातारी माणसं जरा फटकळ, म्हणून अप्रिय असतो. आम्ही बोलण्याचें टाळतों तें ह्याच कारणानें. परंतु सत्यान्वेषणांत आपणहि भाग घेतला पाहिजे या कर्तव्यबुद्धीनेंच मी आज बोलण्याचं ठरवलं आहे. तें चारचौघांनीं ऐकावं, वाटल्यास त्यावर विचार करावा अशीच माझी इच्छा आहे.

पण मी बोलणार तें एका विशिष्ट बाबीबद्दलच बोलणार आहे. उद्योगधंद्यांचं पीक हल्ली बरंच झालं आहे. नोकऱ्या मिळत नाहींत, म्हणून काढ कुठं दुकान, एखादं वर्कशॉप, नाहींतर कारखाना, नी मग 'पैसा पैसा' करीत फीर दारोदार अशी स्थिति आहे.

"निढळाच्या घामानं आयुष्यभर कणाकणांनीं जमा केलेला पैसा आमच्यासारख्या पेन्शनरांनीं भाग भांडवलांत घालावयाचा नी त्याच्यावर डिव्हिडंड न देतां स्वतः बंगल्यांत राहून मोटारी उडवणाऱ्या कारखानदारांकडे त्यांनीं पाहात राहावयाचें!" असें माझे पेन्शनर स्नेही म्हणत असतात. हें कितपत खरें आहे? एखादा कारखानदार ह्या वर्णनास पात्र असेल, नाहीं असें नाहीं, परंतु ही तक्रार बहुसंख्य कारखानदारांचे बाबतींत लागू पडत नाहीं. तीस-चाळीस वर्षांपूर्वी मॅट्रिक पास झाल्याबरोबर आम्हांस सरकारी नोकरी लागली आणि त्यांत चढत चढत आम्ही अंमलदार झालों. आमच्या लायकीची कसोटी लागण्याचा कधीतरी प्रसंग आला का? उलट तरुण कारखानदारांस किती बिकट परिस्थितीशी झगडावें लागत आहे? त्यांस सहाय करण्याऐवजी त्यांचे कांहीं दोष उगाळून आपलें कर्तव्य टाळण्यांत काय अर्थ आहे? आपला पैसा वाटेल त्याचे हातीं देऊं नका, चौकशी करा, खात्री करून घ्या. परंतु आपल्याशीं नवीन तरुणांची तुलना करूं नका; परिस्थितींत फार अंतर पडलें आहे एवढेंच माझें सांगणें आहे.

नोकरींत जमा केलेला पैसा आपल्या आयुष्यभर पुरून, आपल्या मुलाबाळांकरतां राहावा अशी इच्छा कोणाची नाहीं? जमल्यास वेळानें पैसा वाढवावा असेंहि वाटतं, परंतु प्रत्यक्ष माझे मुलास सरकारी नोकरींत जागा मिळणें शक्य नसल्यास त्यास कोठल्या तरी कंपनींतच लावला पाहिजे. तर मग अशा कंपन्यांची वाढ होण्यास मी हातभार नको का लावायला? भरमसाटपणानें पैसे कोणासच देऊं नयेत हें खरें, परंतु योग्य उद्योगास पैसे देण्याची मनाची प्रवृत्ति होणें आवश्यक नाहीं का? लोकांनीं जोखीम स्वीकारून धंदे उभारल्यावर त्यांचेकडे मुलासाठीं नोकरी मागण्यासाठीं जाण्यापूर्वी मी त्यांचेसाठीं काय केलें हें नको का लक्षांत घ्यायला?

माझ्या पोवाच्या, माझ्या वेळाच्या अलिकडल्या पिढीला उपयोग होणार असेल तर त्यांनीं जरूर करून घ्यावा. मात्र माझा विश्वास संपादन करा एवढेंच माझें म्हणणें आहे.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख १० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री० रा० म० अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं.लि.चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ११२A सदाशिव पुणें २

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

सुखाचा शोध

मिनर्व्हा १३ वा आठवडा

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% कन्माफ लोन ( १९४५–५५ ) | ११०—७ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन | १०१–१४ |
| ४% १९४३ | १०३–१४ |
| ३½% बिनमुदत | ८९—२ |
| ३½% १९४७–५० | १००—८ |
| ३% ( १९६३–६५ ) | ८७—८ |
| २¾% १९४८–५२ | ९२–१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | ९९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | ९७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ११७—० |

**मंडळ्यांचे भाग**

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १४२—० |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | १००—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५३०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०७—० |
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३१–१२ |
| कराची ( १०० ) ९% | १८३—२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३६०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४८५—० |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६५—० |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २४८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ५०—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २२—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४१३०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | १९०–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १३७–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ४०८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | २२३२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १३८—८ |





एजंट:—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव पुणें शहर.



PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.



हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.

## ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

**हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )**

मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

(ESTD. 1907)

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

---

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

---

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ६ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे.

---

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. (ऑनर्स), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

---

## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ र्‍या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.

---




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत १०-वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात होणें, दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

श्री इंडो फॉरिन एजन्सीज. (डि. के. १)
२५३/३ माधवविलास, [illegible] पुणें २.

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.